## ईपीसी इंडस्ट्रीजचे पहिले कृषिदालन बुलडाण्यात कार्यान्वित

# ५ वर्षात देशभर कृषी वितरण केंद्राचे जाळे निर्माण करणार – शर्मा



या ईपीसी इंडस्ट्रीजचे उद्घाटन करताना राधेशाम चांडक, शर्मा, संचालक पंडित व अन्य

*जिल्हा प्रतिनिधी/ ४ एप्रिल*

**बुलडाणा** : महिंद्रा ॲण्ड महिंद्राच्या कृषी इक्वीपमेंट विभागाने विकसित केलेल्या ट्रॅक्टरला गेली २९ वर्षापासून सातत्याने भारतीय शेतकऱ्यांनी पसंती दिल्यानंतर, याच कंपनीने ईपीसी इंडस्ट्रीजतर्फे पहिले कृषी शो-रूम संपूर्ण भारतातून महाराष्ट्रातील बुलडाणा शहरात प्रायोगिक तत्वावर आज सुरू केले. येत्या ५ वर्षात देशभर कृषी वितरण केंद्राचे जाळे निर्माण करण्याचे कंपनीचे नियोजन असल्याचे यावेळी महिंद्रा ॲण्ड महिंद्राच्या ॲग्री अलाईड बिझनेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शर्मा यांनी सांगितले.

आज मंगळवार ३ एप्रिल रोजी प्रतिक्षा इरिकेशन चिखली रोड, बुलडाणा येथे या शो-रूमचे उद्घाटन अशोक शर्मा यांनी केले, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बुलडाणा अर्बनचे राधेशाम चांडक तर प्रमुख अतिथी म्हणून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे रविकांत तुपकर, शेतकरी संघटनेचे नामदेव जाधव, रामकृष्णदादा शेटे, पत्रकार राजेश देशमाने व शो-रूमचे संचालक प्रल्हाद पंडीत आदी हजर होते.

या कृषी वितरण केंद्रात लघुपाटबंधारेसाठी ठिबक सिंचन, स्प्रिंकलर व पीव्हीसी पाईप, बियांणे, किटक नाशके, बुरशीनाशके व तणनाशक, कृषीपंप, मांती परिक्षण सुविधा यासह पीकनिहाय कृषीविषयक सल्ला मिळणार आहे.

पुढे बोलतांना अशोक शर्मा म्हणाले की, महिंद्रा ॲण्ड महिंद्राच्या माध्यमातून शेतीशी संबंधित तंत्रज्ञान देशातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करण्यात येत असून त्यातून शेतकरी समृध्द होईल. ईपीसी इंडस्ट्री हा महिंद्रा सुमहाचा एक भाग असून ही १ लघुपाटबंधारे कंपनी आहे. यात उच्च गुणवत्तेचे स्पिंकलर व ठिबक सिंचन यांचे उत्पादन करण्यात येते. नाशिक येथे ही कंपनी कार्यान्वित असून महिंद्रा ॲण्ड महिंद्राच्या कृषी उद्योगातील कृषी अवजारे या विभागाचा एक भाग आहे.

अध्यक्षीय मनोगतात राधेशाम चांडक म्हणाले की, महिंद्रा ॲण्ड महिंद्रासारख्या आंतरराष्ट्रीय अशा कंपनीने ईपीसी इंडस्ट्रीजचे पहिले दालन भारतातून केवळ बुलडाणा जिल्ह्यासाठी द्यावे ही चांगली बाब आहे. यावेळी अन्य वक्त्यांनी पारंपारीक शेती सोडून अत्याधुनिक पध्दतीने शेती करण्यासाठी अशा संधीचा शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन अजीम नवाज राही यांनी केले.